# प्रकरण -१

# दलित कादंबरी प्रेरणा आणि स्वरुप

# प्रकरण पहिले

# दलित कादंबरी प्रेरणा आणि स्वरुप

मराठी साहित्यामध्ये कथा, कविता, नाटक, आत्मचरित्र, चरित्र, ललित लेख, निबंध या वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत कादंबरी या वाङ.मयप्रकाराला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. कादंबरीतील काळ आणि अवकाश इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा अधिक विस्तारीत असल्याने मानवी जीवनातील एखाद्या अनुभवाचा व्यापक आवाका कादंबरीत सामावू शकतो. त्यामुळे जीवनानुभवाचा समग्र व सर्वलक्षी प्रत्यय कादंबरीतून येतो. मराठीमध्ये 'कादंबरी' या शब्दाचा अर्थ 'कल्पित कथा' अशा अर्थाने केला जातो. परंतु बाणाच्या 'कादंबरीतून' हाच अर्थ प्रतीत होतो. कल्पित कथा या शब्दातून कादंबरीचे स्वरुप पूर्णत्वाने स्पष्ट होत नाही. कारण सर्वच कल्पित कथांच्या कादंबरी किंवा सर्वच कादंबऱ्यात केवळ कल्पित कथाच असतात असे म्हणता येणार नाही. कल्पित कथेपासून वास्तववादी प्रयोगशीलतेपर्यंत कादंबरी वाङ्मय बदलत गेलेले दिसते. त्यामुळे मराठी कादंबरीच्या संकल्पनेत विविध स्वरुपाची मतमतांतरे मांडली गेली आहेत.

कादंबरीच्या संकल्पनेच्या संदर्भात विचार करता कादंबरी हे नाव संस्कृत भाषेतून स्वीकारले गेले आहे. प्रामुख्याने बाणभट्टाच्या कादंबरी या नामाभिधानापासून या वाङ्मयप्रकाराला कादंबरी हे नाव मिळालेले दिसते. इंग्रजीतील नॉवेल या शब्दाला पर्याय म्हणून मराठी भाषेमध्ये कादंबरी हे नाव स्वीकारले गेले. नॉवेल शब्दाला इंग्रजीमध्ये प्राप्त झालेले अर्थ म्हणजे चमत्कारिक गोष्ट, तर संस्कृत भाषेत कादंबरी या शब्दाचा अर्थ काल्पनिक गोष्ट असा मानला जातो. चमत्कारिक गोष्टी आणि काल्पनिक गोष्टी या शब्दातून प्रतित होणारा अर्थ म्हणजे कल्पित कथा हा होय. म्हणजेच घडून गेलेल्या एखाद्या घटना किंवा प्रसंगाचा स्वत:च्या कल्पनेने विस्तार करणे म्हणजे कल्पना विस्तार होय. सामान्यत:

विशिष्ट घटनाप्रसंग प्रत्यक्ष कसा घडला असेल, त्या प्रसंगातील व्यक्ती आणि समाज त्यावेळी प्रत्यक्ष कसा वागला असेल, त्यानिमित्ताने काही संघर्ष घडला असेल का? त्या संघर्षात दोन प्रतिपक्षी गटात कोणत्या प्रकारचे संवाद घडले असतील? त्या संवादांची नेमकी भाषा कशी असेल? या प्रकारचा प्रत्यक्ष वाङ्मयीन व्यवहार निवेदनाच्याद्वारे कादंबरीकाराने कसा जिवंत केला. इ. घटक कल्पनाविस्तारामध्ये येतात. कादंबरी म्हणजे कल्पित कथा म्हणत असताना त्यात केवळ रंजनाचा हेतु गृहित नसतो मात्र, इंग्रजीतील नॉवेल म्हणजे चमत्कारी गोष्ट. यामध्ये कळत-नकळत वास्तवापेक्षा रंजनाकडे लक्ष केंद्रित केले जाते.

कादंबरी हे नाव इंग्रजी आणि संस्कृतच्या संपर्काने मराठी भाषेमध्ये रुढ झालेले असले तरी कादंबरीसदृश्य रचना मध्ययुगीन मराठी वाङ्मयात पहावयास मिळते. म्हणजेच कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे काही घटक त्यामध्ये अंतर्भूत झालेले दिसतात. मात्र जरी त्यामध्ये काही घटक जाणवत असले तरी मध्ययुगातील लीळाचरित्र, स्मृतिस्थळ आणि बखर यांना कादंबरी हे संबोधन देता येणार नाही. कारण हा वाङ्मयीन प्रकार विशेषत्वाने आधुनिक कालखंडामध्ये उदयास आलेला आहे. व अशा या वाङ्मयीन प्रकाराच्या स्वरुपासंदर्भात मराठीमध्ये प्रथम चर्चा का.बा.मराठे यांनी केलेली दिसून येते. का.बा.मराठे यांच्या कादंबरी स्वरुपाचे लेखन मराठी भाषेमधील प्रथम लेखन होय, येथूनच मराठी भाषेमध्ये मराठी कादंबरी वाङ्मयप्रकाराच्या स्वरुपाची चर्चा सुरु झाली. असे जरी असले तरी कादंबरीचे स्वरूप एक ठराविक अथवा साचेबंद असतेच असे नाही म्हणून या संदर्भात चंद्रकांत बांदिवडेकर यांनी मांडलेले मत महत्त्वाचे ठरते. ते म्हणतात की, ‘‘कादंबरी हा रचनाप्रकार इतका लवचिक, प्रसरणशील आणि सर्वसमावेशक आहे की, त्याचे स्वरूप सांगता आले तरी त्याच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण असते.’’[१]

डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांनी कादंबरीच्या स्वरुपाची केलेली उपरोक्त चिकित्सा मूलगामी स्वरुपाची आहे. मानवी जीवनातील विशिष्ट कालखंडात, विशिष्ट प्रसंगी घडलेली घटना, विशिष्ट भाषेत मांडत असताना त्यावेळचा सांस्कृतिक अवकाश कादंबरीकारांना मांडावा लागत असल्यामुळे काळ आणि अवकाशाच्या परिघात कादंबरीचे स्वरुप विभिन्न होण्याची शक्यता असते. त्यामुळे कादंबरीच्या निश्चित सीमारेषा सांगणे कठीन असते हे त्यांचे मत ग्राह्य मानावे लागते. कादंबरीचा हा विस्तार घडविण्यासाठी कादंबरीकाराची मनोवृत्ती आणि त्याचे स्वातंत्र्यही परिणाम करत असते. त्यातून होणारा कादंबरीचा विकास नेमका कसा असतो याविषयी भालचंद्र नेमाडे यांनी मांडलेली भूमिका महत्त्वाची होय. त्यांनी कादंबरी या वाङ्मयप्रकाराची संकल्पना मांडतानाअसे म्हटले आहे की,"कादंबरी म्हणजे प्रदिर्घ, भाषिक अवकाश असलेली; आशयसूत्राचे अनेक पदर असलेली; त्यामुळे विस्तृत रचना मांडणारी अनेक पात्रे; प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते."[२]

भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरीची संकल्पना मांडताना कादंबरीमध्ये भाषिक अवकाश असते. अनेक पदरी आशयसूत्र असतात. अनेकविध पात्र आणि प्रसंगांनी कादंबरी हा वाङ्मयप्रकार परिपूर्ण झालेला असतो. ही केलेली मांडणी कादंबरी वाङ्मयप्रकाराचे निश्चित स्वरूप ग्रंथित करते. त्याआधारे कादंबरीच्या संकल्पनेची चर्चा करताना असे म्हणतो की, आशयसूत्र, व्यक्तिरेखा, घटना-प्रसंग आणि कादंबरीकाराचे निवेदन याद्वारे काळानुरूप व अनुभवानुरूप बदलत जाणारा विस्तृत अनुभवाचा अवकाश असणारा वाङ्मयप्रकार म्हणजे कादंबरी होय.

## दलित साहित्य : संकल्पना, स्वरुप आणि प्रेरणा

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतरच्या वाङ्‌मयीन प्रवाहामध्ये दलित साहित्य प्रवाहाला महत्त्वाचे स्थान आहे. दलित या सामाजिक समुहाला धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक घटकापासून उपेक्षित ठेवले होते. त्यामुळे या सामाजिक समुहाच्या वाट्याला उपेक्षा, हिनत्व, अवहेलना, उपासमारी, दारिद्र्य आणि गलिच्छ जीवन आलेले होते. जाणिवपूर्वक राबविला गेलेला असामाजिक व्यवहार यामुळे हा समूह अस्तित्वहीन बनला होता. स्वत्व आणि स्वाभिमान हरवून बसलेला हा समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि तत्वज्ञानामुळे, तसेच या समाजाला आत्मभान यावे म्हणून जाणिवपूर्वक महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह आणि शेवटी बुद्धधम्माचा स्वीकार या चळवळी राबविल्या गेल्या आणि स्वाभिमानशून्य समाज जागा झाला. त्यांनी आंबेडकरी विचारांच्या पाठबळावर दैववाद, अंधश्रद्धा, यांचा त्याग करुन विज्ञाननिष्ट तत्त्वज्ञान आणि मानवतावादी मूल्यांचा अंगिकार केला. अशा या वैचारिक पाठबळामुळे हा उपेक्षित समाजिक समूह, पुराणमूल्य, पुराणव्यवस्था, पुराण धर्मग्रंथ, वर्णव्यवस्था, जात-पात इ. च्या विरोधात बंड करुन उठला. अशा बंडाची भाषा बोलणाऱ्या सामाजिक समुहालाच डॉ.आंबेडकर यांनी दलित हे संबोधन उपयोजिले व या सामाजिक समुहाने आपल्या वेदनांचा अविष्कार ज्या साहित्यातून केला त्याला दलित साहित्य असे नाव रूढ झाले.

दलित साहित्य या वाङ्‌मय प्रांतात प्रामुख्याने कथा, कविता, कादंबरी, नाटक, आत्मकथन, वैचारिक लेखन इ वाङ्‌मय प्रकार प्रतिष्ठा पावलेले आहेत. त्यामध्ये कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराला गेल्या दोन दशकात विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. अशा या दलित कादंबरीच्या प्रांतातील समकालीन दोन कादंबरीकार म्हणजे उचल्या या आत्मकथनामुळे लौकिकास आलेले लक्ष्मण गायकवाड आणि

नव्यानेच दलित साहित्याच्या प्रांतात उजेडात आलेले नाव म्हणजे भास्कर भोसले हे होय. या दोन कादंबरीकारांच्या अनुक्रमे 'वकिल्या पारधी' आणि 'दैना' या दोन कादंबऱ्या संशोधनासाठी निवडलेल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांचे स्वरुप तपासण्यापूर्वी दलित साहित्य आणि त्यांच्या प्रेरणा यांचा शोध घेणे अनिवार्य ठरते.

दलित हा शब्द समूहवाचक आहे त्याच्या संकल्पनेचा विचार डॉ. कृष्णा किरवले[३] यांच्या 'दलित साहित्य आणि चळवळ' या ग्रंथात त्यांनी सविस्तरपणे केलेले आहे. त्यात त्यांनी मराठी शब्दकोशकारांनी दलित शब्दाचे दिलेले अर्थ सविस्तरपणे वर्णन केलेले असून त्याच्या आधारे दलित म्हणजे 'फोडलेले, कुटलेले, चिरडलेले, भरडलेले, दळलेले, तुडविलेले सामाजिक समूह होत.' अशी त्यांची संकल्पना मांडलेली आहे. या संकल्पनेच्या आधारे दलित शब्दांच्या विविध अभ्यासकारांच्या मांडून पुढीलप्रमाने निष्कर्ष काढलेले आहेत.

१. दलित अवस्थेला इथली पारंपरिक व्यवस्था जबाबदार आहे.
२. जन्मानेच ज्यांच्यावर गुलामीचे जीवन लादले ते दलित.
३. माणूस म्हणून जगण्याचा हक्क, मानवी मूल्य नाकारले ते दलित.
४. बहिष्कृत म्हणून ज्यांची उपेक्षा केली ते दलित.
५. ज्यांचा स्पर्श अविट, अमंगळ मानला ते दलित.

ही दलित अवस्था पारंपरिक भारतीय व्यवस्थेचा एक अविभाज्य भाग होता. वर्णव्यवस्थेच्या रुपाने आणि कर्मसिद्धांतांच्याद्वारे दलितत्व जोपासण्याची प्रक्रिया घडली. डॉ.आंबेडकरांमुळे ही अवस्था दलित समूहाला कळली. त्यामुळे अशा उपेक्षित दलित समूहाने आपल्या दलित संवेदना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. त्या संवेदना व्यक्त करताना सामाजिक समूहाने भारतीय संविधानाने प्रमाणित केलेल्या जाती-जमाती, भटके आणि विमुक्त हे चार जातीचे समूह प्रथमतः जातीच्याद्वारे

आपल्या वेदना मांडू लागले. त्या वेदनेच्या साहित्यालाच दलित साहित्य या नावाने संबोधले जाते.

दलित साहित्याच्या कल्पनेविषयी अनेक अभ्यासकांनी संकल्पनात्मक मांडणी केलेली आहे. त्यामधील काही प्रमुख अभ्यासक आणि त्यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : -

"दलितांची दु:खे, कुचंबना, गुलामगिरी कौटुंबिक अध:पात, विपन्नावस्था, विटंबना ह्याचबरोबर दारिद्र्यातही तळपणारे सामर्थ्य, माणुसकी इ. सर्वांगीण जीवनाचे कलात्मक शैलीचे साहित्य म्हणजेच दलित साहित्य."[४]

२. भालचंद्र फडके : -

"बौद्ध, अबौद्ध, महार, चांभार, पूर्वास्पृश्य, भटक्या जमाती, आदिवासी, गुन्हेगार जमाती इ. विविध समूह म्हणजेच सामाजिक अन्याय, दारिद्र्य, अज्ञान, इत्यादींनी ग्रस्त असा दलितवर्ग! या जाणिवेतून दलित जीवनाचे भेदक दर्शन घडविणारे साहित्य ते दलित साहित्य."[५]

३. गंगाधर पानतावणे : -

"दलित साहित्याची चळवळ हा एक मुक्तिसंग्राम आहे.स्वत:ला शोधण्याचा तो एक प्रभावी प्रयत्न आहे. मराठी वाङ्मयात माझे असे चित्र कोणीही रेखाटले नाही. हे चित्र रेखाटण्याची धडपड म्हणजे दलित साहित्य."[६]

४. रमेशचंद्र परमार : -

"चातुर्वर्ण व्यवस्था के अमानुषी व्यवस्था मे जिन्हे पढने लिखनेके षड्यंत्रपूर्ण रीतिसे वंचित कर दिया था, ज्ञान और विज्ञान के द्वार बंद करके शोषण का साधन बना दिया गया था, वही जनसमूह पुरे इतिहास मे पहिली बार कलम का

सहारा लेकर मैदान मे आया है। अनकही कहानी को जन्म मिल रहा है आधुनिक साहित्यिकी ही नही, हिंदुस्थान के पुरे इतिहास मे दलित साहित्य अनहोनी घटना है।"[७]

५. केशव मेश्राम : -

"महाबळेश्वर साहित्य संमेलनातील परिसंवादात प्रा.केशव मेश्राम म्हणाले होते, "हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे."[८]

६.गो.म.कुलकर्णी : -

"प्रस्थापित व्यवस्थेखाली सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या दडपलेला, तळागाळातील माणूस म्हणजे दलित. या माणसांच्या व्यथा-वेदनांचे चित्रण करणारं, त्याच्या आशाकांक्षा व जीवन-जाणिवा व्यक्त करणारं मानवमुक्तीचं साहित्य म्हणजे दलित साहित्य."[९]

वरील अभ्यासकांच्या व्याख्या पाहिल्यानंतर दलित साहित्याविषयी हाती आलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे होत.

१. दलित साहित्य दलित समाजाचा अध:पात, विटंबना आणि दारिद्र्य यांची मांडणी करते.

२. दलित वर्ग दैववाद, भोळेपणा, गुलामगिरी, अज्ञान, अंधश्रद्धा यांच्या विरोधात संवेदना व्यक्त करते.

३. दलित साहित्य हे मानव मुक्तसंग्राम आहे.

४. वर्णव्यवस्थेने वंचित केलेला सामाजिक समूह प्रथमत: आपल्या दु:खाच्या विरोधात साहित्यनिर्मिती करु लागला. त्याला दलित साहित्य संबोधले जाते.

५. हजारो वर्षाच्या अन्यायाविरुद्ध केलेले लेखन म्हणजे दलित साहित्य.

६. दलित माणसाच्या व्यथा-वेदनांचे आणि त्यांच्या मुक्तीचे चित्रण महणजे दलित साहित्य होय.

दलित साहित्याच्या निर्मितीच्या केंद्रस्थानी डॉ.आंबेडकरांच्या प्रेरणा आहेत. हे प्रारंभीच नमूद केलेले आहे. मात्र मराठीमध्ये दलित साहित्याच्या प्रेरणांचा शोध घेताना संत चोखामेळा, केशवसूत, महात्मा फुले, कार्ल मार्क्स इ. विषयी भूमिका मांडल्या जातात. या भूमिका वास्तवाचा विपर्यास होय. संत चोखामेळा यांनी जरी दलित समाजाच्या वेदनेचा पहिला उद्गार काढलेला असला तरी संत चोखामळा यांचे अभंग अध्यात्म आणि दैववादाच्या परिघात मोडणारे होते. त्यांनी व त्यांच्या परिवाराने लिहिलेल्या अभंगातून 'जन्म गेला उष्टे खाता लाज न ये तुझे चित्ता' अशी हाक दिलेली असली तरी 'ठेविले अनंत तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधान' या उक्तीतून संत चोखामेळा आणि त्याचा परिवार बाहेर पडू शकलेला नाही. त्या संदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संत चोखामेळा यांचे ऐतिहासिक कार्य मान्य करुनही 'तुम्ही चोखामेळ्यासारखे व्हा मग आम्ही तुमचा स्वीकार करू' अशी संभावना करुन चोखामेळ्याची परंपरा नाकारली आहे. चोखामेळ्याप्रमाणेच महात्मा फुले यांच्या प्रेरणा दलित साहित्याला पूर्णत: लागू होणाऱ्या नाहीत. विशेषत: महात्मा फुले यांचे सामाजिक विचार इथपर्यंतच डॉ.आंबेडकर त्यांना मान्यता देतात. या सामाजिक विचारातील मानवतावादी मूल्यांचा अंगीकार स्वत: डॉ.आंबेडकर करतात. मात्र त्यांनी मांडलेली सार्वजनिक सत्यधर्माची संकल्पना आणि निर्मिक संकल्पना आंबेडकरी तत्त्वज्ञानात बसणारी नाही. 'निर्मिक' या संकल्पनेत कळत-नकळत दैववाद आणि सार्वजनिक सत्यधर्माच्या उपासनाविधीमध्ये अंधश्रद्धा प्रसूत केली. दलित साहित्य वैज्ञानिक दृष्टिवर केंद्रित असल्यामुळे महात्मा फुले यांचा निर्मिक आणि सार्वजनिक सत्य दलित साहित्याला प्रेरक ठरू शकत नाही. केशवसूतांनी 'अंत्यजाच्या मुलाचा

पहिला प्रश्न' याविषयावर केवळ एकच कविता केली. त्या कवितेचा शेवट अस्पृश्य मुलाच्या प्रश्नाचे उत्तर-मला दूर व्हा का म्हटले? याचे उत्तर या कवितेतील आई देत नाही. त्यामुळे अस्पृश्यतेचे समर्थन केशवसूत करतात की काय अशी शंका येते. त्यामुळे केशवसूत दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी माने योग्य होणार नाही. मार्क्सवादी प्रेरणेच्या बाबतीतही अशीच संदीग्धता आहे. दलित साहित्य हे केवळ आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा अंगीकार करणाऱ्या त्यांच्याच विचारातून प्रेरणा घेवून दलित साहित्याच्या तीन पीढ्यांची साहित्यनिर्मिती झाली आहे. आंबेडकर समकाळात आणि त्यानंतरही दलित साहित्य हे आंबेडकरी चळवळीचे उर्जास्रोत राहिलेले आहे, त्यामुळेच ज्येष्ठ साहित्यिक दलित साहित्याच्या प्रेरणेविषयी म्हणतात की, ''डॉ.बाबासाहेबांचे विचार, कृती, कार्य, आंदोलने व ग्रंथादि साहित्यातूनच दलित साहित्यीकांनी प्रेरणा व स्फुर्ती घेतलेली आहे. त्यात कोणी दलित लेखकांनी आपल्या साहित्यातून कलात्मक रितीने दु:ख चित्रीत केले तर, कोणी नकार व विद्रोहाचे दर्शन घडविले. या सर्व दलित लेखकांच्या साहित्यनिर्मितीचे स्फुर्तीस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत.''[१०] शंकरराव खरात यांच्यासह डॉ.भालचंद्र फडके, डॉ.गंगाधर पानतावणे, डॉ.रा.ग.जाधव इ.मान्यवर आंबेडकरी प्रेरणेचाच आग्रह धरतात. त्यामुळे दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी शुद्ध स्वरुपात आंबेडकरी तत्त्वज्ञान आहे.

आंबेडकरी तत्त्वज्ञानामध्ये समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांवरची निष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोणाचा पाठबळ आणि नैतिक मूल्याला अनन्य साधारण महत्त्व होते. या तात्त्विक विचाराच्या पार्श्वभूमीवरच भारतीय संविधानाच्या माध्यमातून मानवकेंद्री भौतिकवादाची मांडणी केली. अहिंसक आणि लोकशाही प्रक्रियेच्या आधारे राष्ट्राची नवी उभारणी करणारा नवराष्ट्रवाद मांडला. भारतीय संविधानाच्या सरनाम्यात त्याला जाहीर मान्यता दिली. या सर्वाच्या परिणामातून

मानवमुक्तीचा एक आदर्श साकारला. दलित साहित्याला यातूनच उर्जा मिळाली. कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन, वैचारिक लेखन इ. च्या उर्जेवर मानवी कल्यानाचे स्वप्न बाळगू लागले. साहजिकच यातून उपेक्षितांच्या वेदना व्यक्त होऊ लागल्या. विद्रोहाच्याद्वारे बंडाची भाषा आली. ज्या व्यवस्थेमुळे उपेक्षितपण आले, त्या व्यवस्थेविषयी नकार व्यक्त करून मानवतावादी मूल्याचा अंगीकार करणारी तत्त्वप्रणाली स्वीकारली गेली. त्यामुळे दलित साहित्याच्या केंद्रस्थानी वेदना, विद्रोह, नकार आणि मानवतावादाचा स्वीकार या चार त्रयींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या तत्त्वप्रणालींपैकी वेदनेचा सूर विशेषत्वाने आत्मकथनातून आला. तर, विद्रोहाची भाषा दलित कवितेतून प्रतिबिंबीत झाली. नकार आणि मानवतावाद याचे मिश्रण उर्वरित वाङ्मयप्रकार कथा, कादंबरी आणि नाट्यवाङ्मयातून प्रत्ययास येते. मात्र, ही चार तत्त्वे कमी-अधिक प्रमाणात सर्वच वाङ्मयप्रकारात पहावयास मिळतात. लक्ष्मण गायकवाड यांच्या 'वकिल्या पारधी' आणि भास्कर भोसले यांच्या 'दैना' मध्येही याचे प्रतिबिंब अनुभवास येते.

लक्ष्मण गायकवाड आणि भास्कर भोसले हे दलित सामाजिक समूहातील विमुक्त जातीतून जन्माला आलेले दोन साहित्यीक आहेत. दलित साहित्यातील अनुसूचित जाती यांचा साहित्यनिर्मितीमध्ये विशेष सहभाग असून अनुसूचित जमातीमध्ये अभावानेच साहित्यनिर्मिती जाणवते. मात्र, भटक्या-विमुक्त या जाती-समुहात दलित साहित्यनिर्मितीला विशेष महत्त्व असून कादंबरीच्या प्रांतात लक्ष्मण गायकवाड आणि भास्कर भोसले ही नावे वजा करता भटक्या-विमुक्त जमातीमधून विशेष कादंबरी लेखन झालेले दिसत नाही. दलित कादंबरीच्या एकूण स्वरुपाचा विचार करता याचा अधिक अंशाने प्रत्यय येईल.

## दलित कादंबरीचे स्वरुप

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान आणि विचार त्याचबरोबर त्यांनी चालविलेल्या चळवळी यातून प्रेरित झालेले कादंबरीकार आपल्या कादंबरीच्या आशयसूत्राच्या केंद्रस्थानी मंडित करताना दिसतात. आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा सर्वसमावेशक अन्वयार्थ लावून त्या तत्त्वज्ञानाच्या परिप्रेक्ष्यामध्ये दलित व्यक्ती समाज आणि संस्कृतीचा प्रकट अविष्कार कादंबरीकाराने केलेला दिसतो. भुतकाळ, वर्तमानकाळ यांचा अचूक समन्वय साधून मूल्यधिष्ठित भविष्यकालीन समाजनिर्मितीचे स्वप्न दलित कादंबरीकाराने साकारण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: आंबेडकरी तत्त्वज्ञान आणि त्या तत्त्वज्ञानाने भारावलेले प्रारंभीच्या काळातील दलित कादंबरी सशक्त, सर्वसंपन्न असल्याचे अनुभवास येत नाही. असे जरी असले तरी मोठ्या प्रमाणात दलित कादंबरी निर्मितीचा प्रयत्न झालेला आहे. दलित कादंबरीच्या प्राथमिक क्षितिजावरील महत्त्वाची नावे अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना.रा.शेंडे, नामदेव व्हटकर यांच्या रुपाने घेता येतील.

अण्णा भाऊ साठे हे दलित साहित्यातील बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. शाहिरी काव्य, वगनाट्य, नाटक, प्रवासवर्णन याबरोबरच १३ पेक्षा अधिक कथासंग्रह, ३५ च्या जवळपास अधिक कादंबऱ्या लिहून त्यांनी दलितांचे जीवनविश्व सर्वव्यापी स्वरुपात साहित्याचे विषय बनविले. त्यांच्या १९५० ते १९६० या काळात प्रकाशित झालेल्या महत्त्वाच्या कादंबऱ्या वारणेच्या खोऱ्यात, चित्रा, वैजयंता, अलगूज, आवडी, माकडीचा माळ, वैर, गुलाम, डोळे मोडित राधा चाले, चिखलातले कमळ, रत्ना, अहंकार, तारा, वारणेचा वाघ, रानगंगा, आघात, मास्तर, पाझर, संघर्ष, रुपा, आग, कुरूप, फुलपाखरु, मथुरा, मूर्ती, केवड्याचे कणीस, रानबोका इ.कादंबऱ्यांमुळे अण्णाभाऊंचे नाव चर्चेत आले. याशिवाय त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीने दलित साहित्याच्या प्रांतामध्ये त्यांचा नावलौकिक झाले. या


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कादंबरीच्याद्वारे उपेक्षित अशा मातंग समाजाच्या धाडसाचे आणि सामर्थ्याचे, त्याचबरोबर झुंजार आणि बंडखोर व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविते. दलित कादंबरीच्या इतिहासामध्ये विद्रोह अथवा कादंबरीचा आरंभ फकिरा या कादंबरीमुळेच झालेला दिसतो. त्यामुळे दलित कादंबरीच्या इतिहासामध्ये इतर कादंबऱ्यांच्या तुलनेत फकिरा या कादंबरीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले होते. हे महत्त्व प्राप्त होण्यामागे आणखीही महत्त्वाचे कारण आहे, ही कादंबरी अण्णा भाऊंनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बंडखोर विचाराला अर्पण केली आहे. त्यामुळे अण्णा भाऊंचा विचार प्रवास मार्क्सवादाकडून आंबेडकरीवादाकडे कसा होत गेला याचे प्रत्यंतर देणारी ही ऐतिहासिक कादंबरी आहे. पुढिल काळात 'जग बदल घालुनि घाव सांगुनि गेले मला भीमराव' याची बीजे 'फकिरा'मध्ये असल्याचे दिसून येते.

दलित कादंबरीकारामध्ये डॉ.आंबेडकरांचे सांगाती म्हणून ज्यांची ओळख आहे, ते शंकरराव खरात यांनीही कादंबरी लेखन, वैचारिक लेखन, आत्मकथनादी वाङ्मयनिर्मिती करून आंबेडकरी तत्त्वज्ञान, विचारांचा वारसा चालविणारे शंकरराव खरात यांच्या नावावर पुढील कादंबऱ्या आहेत. त्यामध्ये हातभट्टी, मी मुक्त मी मुक्त, झोपडपट्टी, गावचा टिनोपाल गुरुजी, मसालेदार गेस्ट हाऊस, फुटपाथ नं-१, टाऊट, मी माझ्या गावाच्या शोधात, पोतदार, माणुसकीची हक्क इ. कादंबऱ्या त्यांनी लिहिलेल्या आहेत. या कादंबऱ्यातून शंकरराव खरात यांनी उपेक्षित जाती-जमाती, भटके-विमुक्त, झोपडपट्टीमध्ये जगणारे मानवी समूह इ. चे जीवन चित्रित केलेले आहे. यातून दारिद्र्य, उपासमारी, गुंडप्रवृत्ती, भ्रष्टाचार, बेईमानी आदी प्रवृत्तींना त्यांच्या कादंबरीमध्ये स्थान दिलेले आहे. मात्र या कादंबऱ्या सर्वार्थाने दलित जीवनाचे चित्रण करण्यात अपयशी ठरलेल्या आहेत. कथा व आत्मकथनकार म्हणून जी प्रतिष्ठा शंकरराव खरातांना मिळाली ती प्रतिष्ठा त्यांच्या कादंबरी लेखनाला मिळू शकली नाही हे वास्तव आहे.

दलित साहित्याच्या पहिल्या पीढीमध्ये चर्चेत आलेले नाव म्हणजे ना.रा.शेंडे हे होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात काही क्षण घालविण्याची संधी ना.रा.शेंडेंना प्राप्त झाली होती. विदर्भ साहित्य संघाला डॉ.आंबेडकरांनी भेट दिली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी साहित्यविषयक भूमिका मांडलेली होती. ती भूमिका महाराष्ट्रातील तमाम जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम ना.रा.शेंडे यांनीच केलेले होते. त्यांच्या नावावर शृंगारलेले प्रेम, काजळी रात्र या दलित जीवनाशी संबंधीत नसणाऱ्या दोन कादंबऱ्या आणि 'तांबडा दगड' नावाची एकमेव आदिवासी जीवनाशी संबंधीत कादंबरी आहे. आंबेडकरी प्रेरणेशी नाते स्थापित करणारा हा कादंबरीकार दलित जीवनाचे जिवंत आणि धगधगते वास्तव मांडू शकला नाही. किंवा दलित कादंबरीकार म्हणून त्याची स्वतंत्र ओळख होऊ शकली नाही.

नामदेव व्हटकर यांच्या रुपाने मराठी तमाशाची ओळख प्रथम महाराष्ट्राला झाली. आमदार पदावर कार्यरत असणाऱ्या या व्यक्तीने सामाजिक ऋणाच्या हेतूने विविध तमाशा फडांना भेटी देऊन त्याचे दस्तऐवज 'मराठी तमाशा कला आणि साहित्य' ह्या मौलिक ग्रंथातून मांडली. या अनुभवाच्या पातळीवरच त्यांनी 'सोळा शिनगार' नावाची कादंबरी लिहिली. तद्वतच 'अपराधी' या कादंबरीच्या माध्यमातून बेवारस मुलांचा प्रश्नही कादंबरीच्या रुपाने प्रकाशात आणला. याशिवाय 'वाट चुकली' ही नाट्यकृती आणि अन्य वाङ्मयकृतीच्या रुपाने व्हटकर यांचे नाव सर्वज्ञात आहे. दलित कादंबरीच्या क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटविण्यात व्हटकर यशस्वी झालेले नसले तरी तमाशावरील ग्रंथाने ते सर्वपरिचित झाले.

सामान्यत: पहिल्या पीढीच्या दलित कादंबऱ्यांमध्ये अण्णा भाऊ साठे यांच्या फकिरा या कादंबरीने ऐतिहासिक नोंद केली. मात्र खरात, ना.रा.शेंडे आणि व्हटकर यांना दलित कादंबरीचे स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण करता आले नाही.

दलित कादंबरीच्या इतिहासामध्ये ज.वि.पवार, केशव मेश्राम, नारायण जाधव, हिं.गो.बनसोडे, हरिभाऊ पगारे, निशिकांत शेंडे, भिमसेन देठे, भि.शि.शिंदे, सुधाकर गायकवाड, दि.रा.वाघमारे, बा.स.हाटे, नामदेव ढसाळ, अशोक व्हटकर, मुरलीधर जाधव, बाबुराव बागूल, नामदेव कांबळे आणि इतर कादंबरीकारांनी मौलिक योगदान दिलेले आहे. या सर्वांच्या कादंबऱ्यांचा विवेचन इतिहास पुढीलप्रमाणे मांडता येईल.

केशव मेश्राम यांनी कथा, कविता, कादंबरी, समीक्षा, वैचारिक लेखन इ. वाङ्मय प्रकारात लेखन केलेले आहे. विशेषत: कवितेच्या प्रांतात त्यांचे नाव प्रतिष्ठा पावलेले आहे. कादंबरीकार म्हणून केशव मेश्राम यांच्या पोखरण, हकिकत व जटायु या दोन कादंबऱ्या महत्त्वाच्या मानल्या जातात. विशेषत: या दोन्ही कादंबऱ्यांमधून वर्तमान दलित जीवन आणि आदिमकालातील संस्कृतीचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. इतिहास, संस्कृती आणि वास्तव यातील अंतर्विरोध या दोन कादंबऱ्यांमधून मांडलेला आहे. असे जरी असले तरी दलित कादंबरीच्या इतिहासात या कादंबऱ्यांना स्वतंत्र स्थान प्राप्त झालेले नाही.

पुढील काळात ज.वि.पवार यांचे बलिदान, दि.रा.वाघमारे यांची कल्लोळ, हाटे यांच्या युगंधर, युगविधान, युगांत, नारायण जाधव यांचे डॉ.अंजना व दे दान, हिं.गो.बनसोडे यांची मुक्तिसंग्राम व आभाळाएवढी, हभिाऊ पगारे यांची युगप्रवर्तक, बंधुमाधव यांची वगसम्राट, निशिकांत शेंडे यांची कलंकमुक्त, भिमसेन देठे यांची इस्कोट इ.कादंबऱ्यांमधून विविध पातळीवरचे दलित जीवन चित्रित करण्याचा प्रयत्न झालेला आहे. या कादंबरीकारांनी निवडलेले विषय अत्यंत

महत्त्वाचे असून ते विषय दलित जीवनाला संपूर्णत: व्यापणारे आहेत. एकाच वेळी दलित समाज, दलित चळवळ यातील सूक्ष्म बदल टिपण्याचा प्रयत्न हे कादंबरीकार करतात. त्याचप्रमाणे दलित जीवनाच्या परिवर्तनाची नांदी ज्या आंबेडकरी विचार तत्त्वज्ञानामुळे झाली, त्या आंबेडकरांचे व्यक्तित्व, त्यांनी चालविलेल्या चळवळी कादंबरीकारांनी चित्रित केलेल्या आहेत.

सामान्यत: 'बलिदान'मध्ये दलितांमधील राजकीय गटबाजीचा अंतर्भाव दिसून येतो, तर नारायण जाधव यांच्या 'डॉ.अंजना'मध्ये महार स्त्री आणि देशपांडे यांच्यातील आंतरजातीय विवाहाची समस्या चर्चिली गेली आहे. त्याचप्रमाणे 'दे दान' कादंबरीत मातंगांच्या जीवनाचे चित्रण येते. तर 'इस्कोट'मध्ये तमाशात आणि जलशात काम करणाऱ्या कलावंताची दुर्दशा मांडलेली दिसते. मुरलीधर जाधव यांच्या 'कार्यकर्ता' मध्ये दलित चळवळीत कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या जीवनातील अनेक अंतर्विरोध मांडले गेले आहेत. त्याचप्रमाणे सुधाकर गायकवाड 'शूद्र' कादंबरीच्या रुपाने इतिहासकालीन शूद्रांच्या स्थितिगतीची आंबेडकरी तत्त्वज्ञानाच्या आधारे मांडणी करण्याचा प्रयत्न करतात. या कादंबऱ्यांमध्ये आलेले विषय दलित जीवनाचे विविध पैलू साकार करतात. त्यामुळे त्यातून साकारलेले दलित जीवन सर्वस्पर्शी व्यक्त झालेले आहे, हे मान्य करूनसुद्धा या सर्व कादंबऱ्या कादंबरीच्या इतिहासात स्वतंत्र अस्तित्व निर्माण करू शकल्या नाहीत.

हिं.गो.बनसोडे आणि हरिभाऊ पगारे या दोन कादंबरीकारांची प्रवृत्ती वेगळी आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व केंद्रभूत ठेऊन कादंबरी लेखनाचा प्रयत्न केला आहे. 'मुक्तिसंग्राम' या कादंबरीत धर्मांतरानंतर दलितांवर झालेल्या अन्याय, अत्याचाराचे चित्रण आलेले आहे, तर 'आभाळाएवढी' मधून सावित्रीबाई फुले यांचे चरित्र सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांची 'उज्वला'

नावाची कादंबरीही सुधारणावादी प्राध्यापकाच्या कुटुंबाची वाताहत चित्रित करते. त्यामुळे हिं.गो.बनसोडे आंबेडकरी चळवळ आणि त्यांच्या वास्तव रुपाची दखल घेणारा कादंबरीकार म्हणून त्यांचे योगदान मान्य करावे लागते. बनसोडे प्रमाणेच हरिभाऊ पगारे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. तद्वतच त्यांची दुसरी कादंबरी 'कालिंदी' ही आंबेडकरी कार्याची ओळख करून देते. तसेच, 'झुंझार' या कादंबरीच्या रुपाने महात्मा फुलेंचे चरित्र मांडण्याचा प्रयत्न केला. वस्तुत: कादंबरीकाराने केलेला हा चरित्रलेखनाचा प्रयत्न महत्त्वाचा म्हणून मान्य केला तरी डॉ.आंबेडकर, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या महान व्यक्तिमत्वांना शब्दांकित करण्यात आणि त्याची तात्त्विक आणि वैचारिक बैठक सर्वसामर्थ्यानिशी मांडण्यात अपयशी ठरलेले आहे. चरित्रात्मक कादंबरीलेखनाचा त्यांनी केलेला प्रयत्न, त्याचे महत्त्व मान्य करूनही महनीय व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा आवाका कादंबरीच्या आकृतिबंधात मांडू शकले नाहीत.

दलित कादंबरीच्या इतिहासामध्ये केशव मेश्राम आणि सुधाकर गायकवाड यांनी शूद्रांच्या पौराणिक इतिहासाची मांडणी केली आहे. तर, भि.शि.शिंदे हा एकमेव कादंबरीकार दलितांच्या वास्तव इतिहासाची मांडणी 'अमृतनाक' कादंबरीतून करतो. त्यामुळे अमृतनाक कादंबरीला पहिली दलित ऐतिहासिक कादंबरी म्हणून संबोधता येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दलितांच्या ऐतिहासिक पुरुषांचा मागोवा घेत असत. त्यामध्ये कोरेगाव येथे लढलेल्या गौरवशाली महान व्यक्तिबरोबरच शिवकालीन आणि पेशवेकालीन कर्तुत्ववान अमृतनाक, रायनाक, सिद्धनाक या ऐतिहासिक पुरुषांचे दाखले ते देत. भि.शि.शिंदे यांनी यापैकीच अमृतनाक या सुलतानाच्या पदरी असलेल्या ऐतिहासिक व्यक्तिच्या जीवनावरती कादंबरीलेखन केलेले आहे. या कादंबरीच्या अंतरंगातील स्वत:च्या

पौरुषत्वाचे बलिदान देणाऱ्या नीतिमान महावीराची कथा मांडलेली आहे. अमृतनाकाची घडलेली कथा सत्यावर आधारित असली तरी ती भि.शि.शिंदेंनी रंजक पद्धतीने मांडलेली आहे. त्यातील ऐतिहासिक सत्य काहीसे आभासमान झाल आहे. हे मान्य करूनसुद्धा दलित ऐतिहासिक कादंबरीचे प्रारंभिक ऐतिहासिक महत्त्व नाकारता येणार नाही.

मराठी दलित कादंबरीच्या इतिहासामध्ये ज्यांच्या कादंबऱ्यांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यामध्ये अशोक व्हटकर, नामदेव ढसाळ, बाबुराव बागूल, नामदेव कांबळे आणि योगिराज वाघमारे यांचा अंतर्भाव करता येईल. अशोक व्हटकर यांनी विपूल कादंबरीलेखन केलेले असून मराठी साहित्यामध्ये एक महत्त्वाचा कादंबरीकार म्हणून त्यांची गणना केली जाते. त्यांच्या 'मेलेलं पाणी' आणि 'बगाड' या दोन कादंबऱ्या ढोर जमातीच्या व्यथा-वेदनांशी निगडित आहेत. ढोर आणि चर्मकार या अस्पृश्य मानलेल्या जातीच्या पारंपरिक व्यवसायानुसार आलेली उपेक्षा, अवहेलना, अंधश्रद्धा, हीनता, देवभोळेपणा, अज्ञानयामध्ये गुरफटलेल्या समाजाचे चित्र जिवंत रुपात साकार केलेले आहे. पारंपरिक व्यवसायातून मुक्त होऊ पाहणाऱ्या ढोर-चर्मकारांची होणारी कोंडी या कादंबऱ्यातून मांडलेली आहे. या कादंबऱ्यांमुळे अस्पृश्य गणलेल्या ढोर, चर्मकाराचे समाजचित्र वास्तवदर्शी रुपात प्रकट झालेले आहेत. त्यामुळे मराठी कादंबरीप्रमाणेच दलित कादंबरी इतिहासात अशोक व्हटकर यांच्या कादंबरीला प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे.

मराठी कवितेच्या इतिहासात एक कलंदर व्यक्तिमत्व म्हणून अग्रगण्य मानले गेलेले नाव म्हणजे नामदेव ढसाळ होय. गोलपीठा, मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविला, तुही इयत्ता कंची?, 'प्रियदर्शनी' पासून ते वर्तमानातील 'तुझे बोट धरुन जाताना' या कवितासंग्रहापर्यंत कवितेचे अवकाश विस्तारीत नेणारा एक कवी म्हणून नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील बंडखोरी आणि तत्त्वज्ञानाचे चित्रण याचा अचूक

समन्वय साधल्याने ढसाळांच्या कवितेला उंची प्राप्त झाली. त्याच परंपरेचा अविष्कार त्यांनी 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतून केलेला दिसतो. हाडकी हाडवळा या कादंबरीतून बायजा या कर्तबगार स्त्रीच्या कर्तुत्वाची हकिकत मांडली आहे. हाडकी हाडवळा जमिनीवर सुखी जीवन जगणाऱ्या सुखी कुटुंबाचे चित्रण करतानाच भावा-भावामध्ये जमिनीची वाटणी झाल्यानंतर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. शेवटी उपजीविकेसाठी हे कुटुंब मुंबईला पलायन करते. बायजा पतीला सोडून गावी राहते. त्यामुळे तिच्यावर ओढावलेले प्रसंग या कादंबरीत मांडलेले आहेत. हाडकी हाडवळा ही कादंबरी ढसाळांची चरित्रात्मक कादंबरी मानली जाते.

दलित कादंबरीच्या इतिहासामध्ये बाबुराव बागूल यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांची लघुकादंबरी 'सूड' त्याचबरोबर अघोरी, कोंडी, पावश्या या काही महत्त्वाच्या कादंबऱ्या होत. पैकी सुड आणि अघोरी प्रथम प्रकाशित झाल्या आणि त्यांची चर्चाही विशेषत्वाने झाली. 'सूड' या कादंबरीत जानकीच्या जीवनाचा अज्ञानाकडून तात्विकतेकडे होत गेलेला प्रवास मांडलेला आहे. मुरळीच्या पोटी जन्माला आलेली जानकी अमानुष पुरुषी अत्याचाराला कंटाळून स्त्रीत्व नाकारण्यासाठी पुरुषी वेष धारण करून साधूच्या सान्निध्यामध्ये हिमालयाच्या दिशेने प्रवास करते. तपश्चर्याच्या आधारे पुरुषी देह प्राप्त करता येईल असा आशावाद ती बाळगते मात्र, हा आशावाद भ्रामक असल्याची जाणीव तिला होते. स्त्रीदेहाचा सन्मान राखून वाटचाल करणाऱ्या योग्याला सन्मानपूर्वक आपला देह अर्पण करते. येथे ही कादंबरी संपते. त्याचप्रमाणे त्यांची अघोरी ही कादंबरी अघोरी बाबाच्या अंधश्रद्धेला बळी पडलेल्या ग्रामीण कुटूंबाची मानसिकता मांडते. मात्र या कादंबरीतला नायक अघोरी बाबाच्या अंधश्रद्धेला बळी न पडता सुखकर वैवाहिक जीवन कंठितो. पारंपारिक तत्त्वज्ञानातला फोलपणा सिद्ध करणे हेच या कादंबरीचे ध्येय आहे ते उभे करण्यात कादंबरीकार यशस्वी झाले आहेत.

वर्तमान दलित कादंबरीमध्ये नामदेव कांबळे, योगिराज वाघमारे, शरणकुमार लिंबाळे, अनिल सपकाळ यांसह अनेक नवोदित दलित कादंबरीकारांनी समाजाच्या विविध समस्या मांडलेल्या आहेत. नामदेव कांबळे मातंग समाजाच्या व्यथा-वेदनेची मांडणी करण्यास अग्रक्रम देतात. 'राघववेळ' ही कादंबरी त्यादृष्टीने महत्त्वाची ठरलेली आहे. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेली ही पहिली दलित कादंबरी होय. पुढील काळात शरणकुमार लिंबाळे यांनी उपल्या, हिंदू आणि बहुजन या कादंबऱ्यांच्या माध्यमातून दलितांच्या राजकीय पटलावरील अंतर्विरोध मांडला आहे. याच समकाळातील योगिराज वाघमारे आपल्या सभापती, होरपळ, पडझड, धुराळा या कादंबऱ्यांच्या माध्यमातून ग्रामीण पातळीवर होत असलेल्या विविध बदलांच्या पार्श्वभूमीवरती दलित जीवनाची होत असलेली पडझड मांडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. अनिल सपकाळ यांनी 'भडास' कादंबरीच्याद्वारे कोकण परिसरातील दलित जीवनाचा वेध घेतला आहे. दलित कादंबरीच्या ऐतिहासिक प्रवासात झालेला विकास हा या स्वरुपाचा आहे.

मराठी साहित्यामध्ये कादंबरी हा वाङ्मयप्रकार त्यातील काळ, अवकाशाच्या व्यापक पटामुळे त्याचे महत्त्व इतर वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत अधिक व्यापक आहे. मानवी जीवनाची व्यापकता मांडण्यात कादंबरीकार यशस्वी होण्यावरच त्या कादंबरीची महत्तता अवलंबून असते. मराठीमध्ये १८५७ च्या 'यमुनापर्यटन' पासून भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीलेखनापर्यंत कादंबरी वाङ्मय अधिक अवस्थांतरातून वाटचाल करत गेलेले आहे, दलित कादंबरीने या अवस्थांतराचे वर्तुळ पूर्ण केलेले दिसते. सर्वसामान्य व्यक्ती कादंबरीचा नायक होऊ शकते हे दलित कादंबरीकारांनी सिद्ध करून दाखविले आहे. या कादंबरीच्या प्रवासात लक्ष्मण गायकवाड यांची 'वकिल्या पारधी' आणि भास्कर भोसले यांची 'दैना' ह्या कादंबऱ्या महत्वाच्या आहेत. पारधी जमातीच्या व्यथा-वेदनांची केलेली

मांडणी मराठी कादंबरीमध्ये अभिनव व लक्ष वेधणारी आहे. अशा दलित कादंबरीच्या वाठटचालीमध्ये हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. दलित साहित्य आंबेडकरी तत्त्वज्ञान प्रेरणास्थानी मांडते. त्यामुळे दलित कादंबरीकारांनी आंबेडकरी प्रेरणा केंद्रवर्ती ठेऊन वेदना, विद्रोह, नकाराबरोबरच मानवतावादी तत्त्वज्ञानाचा अंगीकार करण्याला महत्त्व दिलेले आहे. त्यांच्या कादंबरी लेखनामागचा हेतु मान्य करून दलित कादंबरीचा स्वतंत्र प्रांत कथा-कविता, आत्मकथनाच्या तुलनेत कादंबरीला विशेष महत्त्व प्राप्त झालेले नाही.

२. दलित कादंबरीच्याद्वारे पौराणिक, ऐतिहासिक आणि वर्तमान काळातील दलितांच्या विविध समस्या मांडलेल्या आहेत. त्यामुळे या कादंबरीतून विविध काळातील दलित समाजाचा इतिहास साकार झालेला आहे. दलित कादंबरीकारांनी वैचारिक, चर्चात्मक आणि अनुभव कथनात्मक या स्वरुपाचे आकृतिबंध कादंबरीच्या केंद्रस्थानी कल्पिलेले आहे.

३. दलित या संकल्पनेच्या अंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटके, विमुक्त इ. समूह अंतर्भूत असून या समुहातील विविध पोटजातीतील विविध सामाजिक समुहातील कलावंताकडून कादंबरी लेखन झालेले आहे, कादंबरीकार ज्या जात समुहात जन्मास आले त्या जातीची सांस्कृतिक परंपरा मांडण्याचा प्रयत्न कादंबरीकाराने केला आहे. विशेषत: महार, मातंग, चर्मकार, ढोर, पारधी, आदिवासी इ. जातगटांची प्रातिनिधीक संस्कृती दलित कादंबरीतून साकार झालेली आहे.

४. भारतीय समाजव्यवस्थेत गावगाडा आणि त्या गावगाड्याची भारतीय कर्मसिद्धांतानुसार तयार केलेली एक साचेबंद व्यवस्था आहे. त्या व्यवस्थेचे व्यवस्थापन बारा बलूतेदारांच्या रुपाने केले जाते. या बलुतेदारांपैकी काही बलुतेदार

जातींची एकूण रचना कादंबरीत प्रतिबिंबित झालेली आहे. त्यामुळे गावगाड्याचे पारंपरिक रचनाबंध दलित कादंबरीकारांनी साकार केले आहे.

५. दलितातील विविध जातीसमूह त्यांचे व्यवसाय, त्यांची भाषा, त्यांचे राहणीमान याचे स्वतंत्र स्थान आहे. कादंबरीकारांनी भाषा, व्यवसाय आणि राहणीमानासह स्वतंत्र अस्तित्व दलित कादंबरीच्या केंद्रस्थानी आणल्यामुळे कादंबरीचा एक स्वतंत्र अविष्कार घडला आहे.

६. कादंबरी हा वाङ्‌मयप्रकार भाषिक अवकाश, अनेक पदरी आशयसूत्रे, आणि अनेकपात्र प्रसंगांनी परिपूर्ण झालेला असतो. दलित कादंबरीही त्याला अपवाद नाही.

७. आंबेडकरी प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती झाली. त्याचप्रमाणे दलित कादंबरीची निर्मिती ही आंबेडकरी प्रेरणेतून झालेली आहे.

८. दलित कादंबरीतील 'दलित' हा शब्द समूहवाचक असून त्यात किमान अस्पृश्य, भटके-विमुक्त आणि आणि आदिवासी या चार जातीसमुहाचा अंतर्भाव करता येतो. अशी दलित समीक्षकांची भूमिका आहे.

९. दलित कादंबरीतून सामान्यत: अस्पृश्य, भटके-विमुक्त आणि आदिवासी जातीसमुहांचे चित्रण आले आहे.

१०. 'वकिल्या पारधी' आणि 'दैना' या कादंबऱ्या विमुक्त जातीतील पारधी जमातीच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या आहे.

**संदर्भ:-**

१. (बांदिवडेकर चंद्रकांत/मराठी कादंबरीचा इतिहास/मेहता प्रकाशन/पृ.५.)

२. (नेमाडे भालचंद्र / टीकास्वयंवर/ साकेत प्रकाशन औरंगाबाद/ द.आ.२००१ / पृ.२५३)

३. दलित साहित्य आणि चळवळ (पृ.२३)

४. (अस्मितादर्श दिवाळी अंक १९७३/ संपादक गंगाधर पानतावणे/ ऑ.डिसें १९७३.)

५. (दलित साहित्य वेदना आणि विद्रोह/ भालचंद्र फडके/ श्राविद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे-३०)

६. (मागोवा/दिवाळी अंक १९७३./दलित सा. प्रेरणा व प्रवृत्ती. पृ.३४)

७. (१४ वा अस्मितादर्श साहित्य मेळावा, जळगाव १९८८/ संपा- बबन चह्रांदे/ प्रकाशनकाळ- १४ व १५ मे १९८८./ उद्घाटकीय भाषण- रमेशचंद्र परमार)

८. (दलित साहित्य: वेदना आणि विद्रोह/ भालचंद्र फडके/श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे-३० प.आ/ डिसेंबर १९७७.)

९. (दलित सा. प्रवाह आणि प्रतिक्रिया/ गो.म.कुलकर्णी/ प्रतिमा प्रकाशन,१३५५ सदाशिव पेठ, पुणे-३०/ प.आ १३-१-१९८६)

१०. (शंकरराव खरात/ दलित साहित्य प्रेरणा व प्रवृत्ती/ इनामदार बंधु प्रकाशन/ ६३७, सदाशिव पेठ, पुणे/ आ.प. मार्च १९७८ पृ.क्र.३९)